**Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies,**
*Online ISSN 2278-8808, SJIF 2021 = 7.380, www.srjis.com*
*PEER REVIEWED & REFEREED JOURNAL, JAN-FEB, 2022, VOL- 9/69*

# जळगांव जिल्ह्यातील पहूर गांवातील इयत्ता नववीच्या विद्यार्थ्यांच्या इंग्रजी भाषेच्या शब्दसंपत्तीवर होणाऱ्या भाषिक खेळांच्या परिणामकारतेचा अभ्यास

**शंकर रंगनाथ भामेरे[१] & सुहास सखाराम पाठक[२], Ph. D.**

*[१]संशोधक, एम. फिल. प्रशिक्षणार्थी, डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद. Gmail- srbhamere1983@gmail.com*

*[२]मार्गदर्शक, सहाय्यक प्राध्यापक, शिक्षणशास्त्र विभाग, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद. Gmail- sspathak2010@gmail.com*

**Paper Received On:** 21 FEB 2022
**Peer Reviewed On:** 28 FEB 2022
**Published On:** 1 MAR 2022

**Abstract**

*भाषा ही मानवाला मिळालेली एक अनमोल अशी देणगी आहे. भाषेच्या माध्यमातून प्रत्येक व्यक्ती एकमेकांशी संवाद साधु शकते. संवाद साधन्यासाठी भाषा हे प्रभावी आणि परिणामकारक असे माध्यम आहे. भाषा विकासात शब्दांचे महत्त्वाचे स्थान आहे. प्रस्तुत संशोधनात इयत्ता नववीच्या विद्यार्थ्यांच्या इंग्रजी भाषेच्या शब्द संपत्तीवर भाषिक खेळांच्या परिणामकारकतेचा अभ्यास करण्यात आला आहे. संशोधकाने या संशोधनासाठी प्रायोगिक संशोधन पध्दतीचा उपयोग करुन प्रश्नावली या साधनाच्या माध्यमातून माहीतीचे संकलन केले आहे. पूर्व चाचणी आणि उत्तर चाचणी दरम्यान विविध भाषिक खेळांचे प्रत्यक्ष आयोजन करुन संकलित केलेल्या माहीतीचे विश्लेषन आणि अर्थनिर्वचन केले. त्यानंतर शेकडेवारी या सांखिकीय परिमाणाच्या सहाय्याने निष्कर्ष काढून शिफारशी सुचविण्यात आल्या आहेत.*

*पारंपारिक अध्यापन पध्दतीपेक्षा भाषिक खेळांच्या माध्यामतून केलेले अध्यापन अधिक परिणामकारक आणि आनंददायी होते. विद्यार्थी मनाचे कान करुन अध्ययन—अध्यापन प्रक्रीयेत उत्स्फुर्तपणे सहभागी होतात. भाषिक खेळांच्या प्रभावी अंमलबजावणीमुळे विद्यार्थ्यांच्या भाषिक शब्द संपत्तीमध्ये सुमारे ८ ते ४८ टक्क्यांपर्यंत सुधारणा झाल्याचे सदर संशोधनातून समोर आले आहे.*

*Scholarly Research Journal's is licensed Based on a work at www.srjis.com*

*Copyright © 2022, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies*

**भाषिक खेळांतून भाषा समृध्दी:**

मानवाच्या प्रगतीच्या विविध टप्प्यांमध्ये भाषेचा विकास होत गेला. प्रारंभी अभिनयातून संवाद साधणारा मानव हळूहळू भाषिक शब्दांमधुन आपल्या भावभावना व्यक्त करु लागला. कालांतराने विविध भाषांची निर्मीती होत गेली. भाषा ही प्रवाही असल्याने त्यात कालानुरुप बदलही होत गेले. इंग्रजी भाषा ही प्रामुख्याने परकीय भाषा असल्याने मातृभाषेच्या तुलनेत विद्यार्थ्यांच्या मनात एक प्रकारची भिती आणि न्यूनगंड पहावयास मिळतो. ग्रामिण भागातील विद्यार्थ्यांच्या मनात इंग्रजी भाषेबद्दल आत्मविश्वास निर्माण व्हावा, त्यांची शब्द संपत्ती वाढावी, यासाठी विविध भाषिक खेळ महत्त्वाचे ठरतात.

संवाद साधण्यासाठी लिहीणे, वाचणे, बोलणे, इशारे हावभाव, मुक अभिनय, मुद्राभाव असे अनेक माध्यम आहेत. परंतु भाषा हे अतिशय प्रभावी आणि परिणामकारक साधन आहे. भाषेला इंग्रजी भाषेत लॅंग्वेज, ;स्दहनंहमद्ध असे म्हणतात. हा शब्द 'लिंग्वा' या लॅटीन शब्दापासून तयार झालेला असून त्याचा अर्थ जीभ असा होतो.

भाषा विकासात प्रामुख्याने १) आकलन २) शब्दसंग्रह ३) वाक्यरचना आणि ४) शब्दोच्चारण या चार टप्प्यांचा समावेश होतो. माध्यमिक शाळेत शिक्षण घेत असताना विद्यार्थ्यांची खऱ्या अर्थाने जडण—घडण होत असते. या शालेय वळणावर विद्यार्थ्यांसाठी विविध खेळांच्या आयोजनातून शब्दसंपदा वाढविता येऊ शकते. शब्द हे प्रत्येक भाषेचे प्राण आहेत. शब्दांमुळेच भाषा प्रवाही आणि जिवंत असते. संत तुकाराम महाराज शब्दांचे सामर्थ प्रकट करताना आपल्या अभंगात सांगतात.

**आम्हा घरी धन शब्दांचीच रत्ने।**
**शब्दांचीच शस्त्रे यत्न करु ।।१।।**
**शब्दचि आमुच्या जीवाचे जीवन।**
**शब्द वाटु धन जनलोका ।।२।।**
**तुका म्हणे पहा शब्दची हा देव।**
**शब्देचि गौरव पुजा करु ।।३।।**

*Copyright © 2022, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies*

**संशोधनाची गरज :**

इंग्रजी ही परकीय भाषा असल्याने इंग्रजी भाषेबद्दल विद्यार्थ्यांच्या मनात एक प्रकारची अनामिक भिती अनुभवावस येते. ग्रामीण भागात याचे प्रमाण अधिकच जाणवते, तथापि, आज २१ व्या शतकात वावरत असताना इंग्रजी भाषेला जागतिक भाषेचा दर्जा मिळाला असल्याने आपणांस इंग्रजी भाषेकडे दुर्लक्ष करुन चालणार नाही. विद्यार्थ्यांना इंग्रजी भाषेविषयी आवड निर्माण होवून त्यांच्यात एक आत्मविश्वासाचे वातावरण तयार होण्यासाठी खेळांच्या माध्यमातून काही योजना तयार करता येतील का? याच विचारातून सदर संशोधन करण्यात आले आहे.

'खेळ' मग ते कोणतेही असो, विद्यार्थ्यांना खुप आवडतात. किंबहुना 'खेळणे' हा मानवी स्वभाव आहे. याच स्वाभाविक गुणधर्माचा उपयोग करुन विविध भाषिक खेळांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना अध्यापन केल्यास अध्ययन निष्पत्ती नजरेच्या टप्प्यात येऊ शकेल यासाठी या संशोधनाची गरज आहे.

**प्रस्तुत संशोधनाचे महत्त्व :**

शालेय जीवनात झालेले शब्दसंस्कार विद्यार्थ्यांच्या पुढील जीवनाची शिदोरीच असते. शब्द केवळ अक्षर समुह नसतो, तर त्यात दडलेला असतो एक अर्थ आणि भावना. हा अर्थ आकलनाच्या पातळीवर गेला की, खऱ्या अर्थाने त्या शब्दाचे उपयोजन विद्यार्थी आपल्या दैनंदिन जीवनात योग्य वेळी योग्य प्रकारे करु शकतात.

सदर संशोधनातून विद्यार्थ्यांमधून इंग्रजी भाषेची गोडी तर लागणार आहेच शिवाय त्यांची शब्द संपत्ती टवबंइनसंतल अधिक समृध्द होणार असल्याने माध्यमिक स्तरावर शिक्षण घेणाऱ्या इयत्ता नववीच्या विद्यार्थ्यांसाठी सदर संशोधन अत्यंत महत्त्वाचे आहे.

**संशोधनाची उपयोगिता :**

प्रस्तुत संशोधनामुळे विद्यार्थ्यांच्या मनातील इंग्रजी विषयाची भिती दूर होऊन त्यांच्या मनात इंग्रजी भाषेबद्दल आत्मविश्वास निर्माण होण्यास मदत होईल. तसेच विद्यार्थ्यांच्या इंग्रजी भाषेच्या शब्दसंपत्तीत वाढ होऊन इंग्रजी भाषेची गोडी लागण्यास मदत होईल.

*Copyright © 2022, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies*

**संशोधनाची गृहितके :**

१) विद्यार्थ्यांच्या मनात इंग्रजी भाषेची भिती असते.

२) पारंपरिक अध्यापन पध्दतीतुन विद्यार्थी कंटाळतात.

३) भाषिक खेळातून विद्यार्थ्यांची शब्दसंपत्ती वाढण्यास मदत होते.

**संशोधनाची उद्दिष्टे :**

१) जळगांव जिल्ह्यातील पहूर गांवातील इयत्ता नववीच्या विद्यार्थ्यांच्या इंग्रजी भाषेच्या शब्दसंपत्ती विषयी माहिती जाणून घेणे.

२) भाषिक खेळांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांच्या मनात इंग्रजी भाषेची गोडी निर्माण करणे.

३) भाषिक खेळांच्या सहाय्याने विद्यार्थ्यांमधील शब्दसंपत्ती वाढविणे.

४) इंग्रजी भाषेविषयीचा न्युनगंड दूर करणे.

५) भाषिक खेळांच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी शिफारशी सुचविणे.

**परिकल्पना :**

१) पहूर गांवतील इयत्ता नववीच्या विद्यार्थ्यांची इंग्रजी भाषेची शब्दसंपत्ती वाढविण्यात अडचणी येतात.

२) भाषिक खेळांच्या सहाय्याने दैनंदिन अध्यापन केल्यास विद्यार्थ्यांना इंग्रजी भाषेची आवड निर्माण होते.

३) भाषिक खेळांतून इयत्ता नववीच्या विद्यार्थ्यांच्या इंग्रजी भाषेच्या शब्दसंपत्तीत वाढ किंवा सुधारणा होण्यास मदत होते.

**संशोधन पध्दती :**

प्रस्तुत संशोधनासाठी संशोधकाने प्रायोगिक संशोधन पध्दतीचा उपयोग केलेला आहे.

**नमुना निवड :**

प्रस्तुत संशोधनाच्या अभ्यासासाठी जळगांव जिल्ह्यातील पहूर गांवातील तीन माध्यमिक शाळांमधील इयत्ता नववीच्या ५० विद्यार्थ्यांची सहेतूक नमुना निवड पध्दतीने निवड करण्यात आलेली आहे.

*Copyright © 2022, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies*

**संशोधनाची कार्यपध्दती :**

प्रस्तुत संशोधनात माहिती संकलनासाठी संशोधकाने स्वनिर्मीत प्रश्नावलीचा उपयोग केला आहे.

**संशोधनाची कार्यपध्दती :**

संशोधनाची प्रत्यक्ष कार्यवाही पार पाडतांना संशोधकाने सर्वप्रथम मार्गदर्शकांच्या मार्गदर्शनाखाली संशोधन समस्यानुरुप उद्दिष्टे, गृहीतके, परिकल्पना तसेच व्याप्ती व मर्यादा निश्चित करुन संशोधनाला अभ्यासपूर्ण बैठक लाभावी आणि निश्चित अशी दिशा प्राप्त व्हावी म्हणून संशोधन विषयाच्या अनुषंगाने संबंधित साहित्य व पूर्ण संशोधनाचा आढावा घेतला.

प्रस्तुत संशोधन समस्या जळगांव जिल्ह्यातील पहूर गांवातील इयत्ता नववीच्या विद्यार्थ्यांच्या इंग्रजी भाषेच्या शब्दासंपत्तीवर भाषिक खेळांच्या परिणामकारकतेचा अभ्यासही असल्यामुळे अर्थातच वर्तमानकालीन सद्यस्थिती जाणून घेत भाषिक खेळांच्या परिणामकारकतेचा अभ्यास जाणून घेण्यासंदर्भात असल्यामुळे संशोधकाने प्रायोगिक पध्दतीची निवड केली.

माहिती संकलित करण्यासाठी संशोधन उद्दिष्टानुरुप प्रश्नावली तयार करुन ती पथदर्शक अभ्यासाने प्रमाणित करुन घेतली. न्यादर्श म्हणुन निवडलेल्या शाळांच्या मुख्याध्यापकांची पुर्व परवानगी घेऊन प्रथम संबधित विद्यार्थ्यांकडून प्रश्नावली भरुन घेतली. त्यानंतर सदर विद्यार्थ्यांना विविध भाषिक खेळांच्या माध्यमातून मार्गदर्शन केले. कृतीयुक्त भाषिक खेळांमध्ये संपूर्ण विद्यार्थी उत्स्फुर्तपणे सहभागी झाले. वर्गाध्यापनात खालील भाषिक खेळ घेण्यात आले.

*Copyright © 2022, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies*




**माहितीचे विश्लेषण व अर्थनिर्वचन :**

जळगांव जिल्ह्यातील पहुर गांवातील सावित्रीबाई फुले माध्यमिक विद्यालय, आर.टी.लेले हायस्कुल, व कनिष्ठ महाविद्यालय, आणि आर.बी.आर. कन्या विद्यालयातील इयत्ता नववीच्या विद्यार्थ्यांकडून माहिती संकलित केली. प्राप्त माहिती ही विस्कळीत स्वरुपात असल्याने प्रत्यक्ष प्रश्ननिहाय उत्तरांचे एकत्रिकरण करण्यात आले. व त्यानुसार त्यांचे रुपांतर विविध कोष्टकात करुन त्यानुसार आलेख तयार करण्यात आले. त्यांची वारंवारीता काढण्यात आली व शेवटी प्राप्त माहितीचे रुपांतर शेकडेवारी या सांख्यिकीय परिमाणात केले.

प्रतिसादकांकडून भरुन घेतलेली पुर्व चाचणी व उत्तर चाचणी दोन्हींचा तौलनिक अभ्यास करुन आलेख तयार करण्यात आले. प्राप्त आकडेवारी संकलीत करुन कोष्टकात मांडणी करुन त्यानंतर प्रत्येक प्रश्नानुसार कोष्टक तयार करुन त्यानुसार निष्कर्ष काढण्यात आले.

Copyright © 2022, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies


**कोष्टक**

**'नाम' विषयी शब्द साखळीतील उपक्रमातील पूर्व व उत्तर चाचणी बाबत माहिती दर्शविणारे कोष्टक**

| **भाषिक खेळ** | **पुर्व चाचणी** | | **उत्तर चाचणी** | |
|---|---|---|---|---|
| Word chain Noun | योग्य प्रतिसाद | अयोग्य प्रतिसाद | योग्य प्रतिसाद | अयोग्य प्रतिसाद |
| **प्रतिसादक संख्या** | 7 | 18 | 16 | 9 |
| **शेकडेवारी** | **28%** | **72%** | **64%** | **36%** |

**आलेख**

**'नाम' विशयी शब्द साखळीतील उपक्रमातील पूर्व व उत्तर चाचणी बाबत माहिती दर्शविणारा आलेख**




**निरिक्षण :** वरील कोष्टकाचे निरीक्षण केले असता, आपणास असे लक्षात येते की, Word Chain of Noun या घटकांवर आधारीत पुर्व चाचणीत २८ टक्के विद्यार्थ्यांनी तर उत्तर चाचणीत ६४ टक्के विद्यार्थ्यांनी योग्य प्रतिसाद दिलेला आहे.


**कोष्टक**

**'उपसर्ग' या उपक्रमातील पूर्व व उत्तर चाचणी बाबत माहिती दर्शविणारे कोष्टक**

| **भाषिक खेळ** | **पुर्व चाचणी** | | **उत्तर चाचणी** | |
|---|---|---|---|---|
| Prefix Activity | योग्य प्रतिसाद | अयोग्य प्रतिसाद | योग्य प्रतिसाद | अयोग्य प्रतिसाद |
| **प्रतिसादक संख्या** | 10 | 15 | 13 | 12 |
| **शेकडेवारी** | **40%** | **60%** | **88%** | **12%** |

**आलेख**

**'उपसर्ग' या उपक्रमातील पूर्व व उत्तर चाचणी बाबत माहिती दर्शविणारा आलेख**




**निरिक्षण** : वरील कोष्टकाचे निरीक्षण केले असता, आपणास असे लक्षात येते की, च्तमपिग ।बजपअपजल या घटकांवर आधारीत पुर्व चाचणीत ४० टक्के विद्यार्थ्यांनी तर उत्तर चाचणीत ८८ टक्के विद्यार्थ्यांनी योग्य प्रतिसाद दिलेला आहे.

*Copyright © 2022, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies*

**विद्यार्थी प्रश्नावलीवरुन प्राप्त निष्कर्ष :**

१) भाषिक खेळांमुळे प्राप्त होणाऱ्या विद्यार्थ्यांच्या शब्दसंपत्तीमध्ये वाढ होण्यास मदत होते.

२) भाषिक खेळामुळे विद्यार्थ्यांच्या मनात भाषेची गोडी निर्माण होते.

३) भाषिक खेळाडूंच्या माध्यमातून विद्यार्थ्यांमध्ये इंग्रजी भाषेविषयी आत्मविश्वास निर्माण होवून त्यांच्यातील न्युनगंड कमी होतो.

४) भाषिक खेळामुळे विद्यार्थ्यांना आनंददायी वातावरणात भाषिक अनुभव देता येतात.

**प्रमुख निष्कर्ष :**

१) भाषिक खेळांच्या सहाय्याने भाषिक शब्दसंपत्ती वृध्दींगत होण्यास मदत होते.

२) इंग्रजी भाषेतील विविध भाषिक खेळांमुळे अध्ययन अध्यापन प्रक्रिया आनंददायी आणि विद्यार्थी केंद्रीत होण्यास सहाय्य मिळते.

३) भाषिक खेळातून इयत्ता नववीच्या विद्यार्थ्यांच्या इंग्रजी भाषेच्या शब्दसंपत्तीत वाढ किंवा सुधारणा होण्यास मदत होते.

४) भाषिक खेळांमुळे विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास निर्माण होतो.

५) भाषिक खेळांमुळे भाषाविषयक न्युनगंड दूर होऊन भाषिक कौशल्य वाढवण्यास मदत होते.

**शिफारशी :**

**(अ) विद्यार्थ्यांसाठी शिफारशी :**

१) विद्यार्थ्यांनी भाषिक खेळांच्या माध्यमातून शब्दसंपत्ती वाढवावी.

२) भाषिक खेळांमध्ये सक्रीय सहभाग नोंदवावा.

३) खेळांच्या सहाय्याने गटागटात स्पर्धात्मक वातावरण निर्माण करावे.

४) स्वत: विविध भाषिक खेळांची निर्मीती करावी.

५) फुरसतीच्या वेळी भाषिक खेळ खेळावेत.

*Copyright © 2022, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies*

**समारोप**

आज आपण २१ व्या शतकात वावरत आहोत. ज्ञानाच्या कक्षा विज्ञान आणि तंत्रज्ञानातील संशोधनामुळे वाढल्या आहेत. सुक्ष्मातीसुक्ष्म अभ्यास करण्याच्या दृष्टीकोनातून विशेष विषयांची निर्मीती झालेली आहे.

असे म्हणतात की, एखाद्या व्यक्तीने आयुष्यभर सतत ज्ञानार्जनाचे काम केले, तरी ते एका क्षुल्लकशा थेंबासारखे असते. यावरुन ज्ञानाच्या सागराची प्रचिती येते. प्रत्येकजण आपापल्या परीने शिक्षण घेऊन ज्ञानाची भुक भागवित असतो. याच ज्ञानामुळे माणसाची जिज्ञासुवृत्ती जागृत होत असते. त्यामुळे नवनविन शोध, अनेक समस्यांवर प्रभावी उपाय शोधण्याचे कार्य केले जाते.

शैक्षणिक क्षेत्रातील समस्यांवर विचार व अभ्यास करुन एक ठोस अशी उपाययोजना राबविण्याचे काम शिक्षणशास्त्रामार्फत केले जाते. बदलत्या ज्ञान आणि गरजांमुळे शिक्षण क्षेत्रात अनेक समस्या निर्माण हेत होत आहेत. या समस्यांच्या निराकरणासाठी संशोधन ही काळाची गरज आहे.

प्रस्तुत संशोधनात संशोधकाने जळगांव जिल्ह्यातील पहूर गांवातील इयत्ता नववीच्या विद्यार्थ्यांच्या इंग्रजी भाषेच्या शब्दसपत्तीवर होणाऱ्या भाषिक खेळांच्या परिणामकारकतेचा अभ्यास केलेला आहे. सदर संशोधनासाठी प्रायोगिक संशोधन पध्दतीचा उपयोग करुन पुर्व चाचणी आणि उत्तर चाचणी यांच्या दरम्यान विविध भाषिक खेळांचे संबंधीत शाळांमध्ये आयोजन करुन माहिती संकलित करण्यात आली. पहूर गांवातील तीन माध्यमिक शाळांमध्ये ५० विद्यार्थ्यांची सहेतूक नमुना निवड पध्दतीने निवड करण्यात आलेली आहे. माहिती संकलनासाठी स्वनिर्मीत प्रश्नावलीचा उपयोग करण्यात आला असून प्राप्त माहितीवर संस्करण करुन विश्लेषण व अर्थनिर्वचन करण्यात आले. त्यानंतर सांखिकीय परिमाणाच्या सहाय्याने निष्कर्ष काढण्यात आले. संशोधनांती उद्दिष्टे आणि परिकल्पनांची पडताळणी करण्यात आली. प्राप्त निष्कर्षांद्वारे परिकल्पना सिध्द झाल्याचे स्पष्ट झाले. शिफारशी सूचवुन पुढील संशोधनासाठी विषय निश्चित करण्यात आले. प्रस्तुत संशोधनामुळे विद्यार्थ्यांच्या इंग्रजी

*Copyright © 2022, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies*

भाषेच्या शब्दसंपत्तीमध्ये वाढ होण्यास मदत होऊन इंग्रजी भाषेविषयीचा आत्मविश्वास वाढीस लागणार आहे.

**संदर्भ ग्रंथसूची**

**पुस्तके :**

*आगलावे, प्रदीप (जानेवारी २०२०), सामाजिक संशोधन : सातवी आवृत्ती, नागपूर, श्री साईनाथ प्रकाशन.*

*भिंताडे, वि.रा.(१९९४), शैक्षणिक संशोधन पध्दती, पुणे, नुतन प्रकाशन.*

*पंडीत, बन्सी बिहारी, (१९९७), शिक्षणातील संशोधन, पुणे, नुतन प्रकाशन.*

*संत, दु.का.(१९८८), संशोधन पध्दती, प्रक्रिया व अंतरंग, पुणे, विद्यार्थी गृह प्रकाशन.*

*५. पारसनीस हेमलता (नोव्हेंबर २००६), शैक्षणिक संशोधन नमुना निवड : पुणे, कॉम प्रिंट कल्पना प्रा.लि.*

*मुळे, रा.श.आणि उमाठे, वि.तू. (१९९८), शैक्षणिक संशोधनाची मूलतत्तवे, नागपूर, नुतन प्रकाशन.*

*भिलेगांवकर, सदानंद व भिलेगांवकर, स्मिता, (२००६), माध्यमिक शिक्षणाची कार्यपध्दती, पुणे : नुतन प्रकाशनत्र*

*कायंदे पाटील, गंगाधर वि. (२००६), भारतीय शिक्षण इतिहास आणि समस्या : नाशिक, चैतन्य प्रकाशन.*

*साळी, व.झा. आणि करंडीकर, एस. (२००६), कृतिसंशोधन व नवोपक्रम, कोल्हापूर : फडके प्रकाशन.*

*करंदीकर, सुरेश (जुलै २००७), शैक्षणिक मानसशास्त्र : सातवी आवृत्ती, कोल्हापूर : फडके प्रकाशन.*

**इंग्रजी संदर्भ :**

*Buch, M.B. (1978-83) Tribal Survey of Research in Education, New Delhi, Prientaly Hall of India Private Limited.*

*Best, J.W., and Kahn J.V. (2004), Research in Education, New Delhi Prints Wall of India, Private Limited.*

*Hader, J.J. and Kindmar, E.C. Hays Dynamic Social Research*

*Kumar, A Social Research Methods (1997), New Delhi Anmol Publicatikons, Pvt. Ltd.*

*Bogardus, E.S. (1936), Introduction to Social Research.*

*Copyright © 2022, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies*